# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.१०/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १४ मार्च, २००७.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये व पोटनिवडणुकांमध्ये समाजातील निरनिराळया व्यक्तींविरुध्द अनेक प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने आचारसंहिता भंगाच्या गुन्हयांचा समावेश असतो. त्याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतदान साहित्याची नासधूस करणे, मतदान अधिकाऱ्यांशी असभ्य व्यवहार करणे, त्यांना मारहाण करणे, समाजातील वेगवेगळया घटकांमध्ये वैर पसरविणे, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे वक्तव्य अथवा लिखाण करणे, मतदानासाठी लाच देणे, निवडणुकीत दबाव टाकणे, दुसऱ्याच्या नांवाने मतदान करणे, निवडणुकीसंदर्भात बेकायदेशीर देयके देणे, निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब न देणे, लोकांमध्ये भ्रम निर्माण होईल असे निवेदन करणे व इतर प्रकारच्या गुन्हयांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या गुन्हयांबाबत पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तींविरुध्द न्यायालयात दावा दाखल करण्यात यावयास हवा. परंतु, बऱ्याचदा राज्य शासनाच्या परवानगीने असा दावा किंवा नोंदविलेला गुन्हा मागे घेण्यात येतो.

२. असा दावा किंवा गुन्हा मागे घेतल्याने निवडणुकीमध्ये काहीही केले तरी चालते, असा लोकांमध्ये समज पसरु शकतो. असा समज लोकांमध्ये पसरणे म्हणजे निवडणुकीचे महत्व कमी करण्यासारखे आहे. पर्यायाने लोकशाहीची ती एक प्रकारची

थट्टाच आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए खाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या या अनुच्छेदांखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र, निष्पक्ष वातावरणात व पारदर्शीपणे पार पाडाव्यात यासाठी राज्य निवडणूक आयुक्त या नात्याने असे आदेश देत आहे की, असा दावा किंवा गुन्हा मागे घेताना राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) महासंचालक, पोलिस, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व महानगरपालिका आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस आयुक्त
९) सर्व पोलिस अधिक्षक,
१०) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
११) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab११७.doc